॥ जांभूळ पिकल्या झाडाखाली ॥

गायकः आशा भोसले, रविंद्र साठे
गीतः ना धों महानोर
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

जांभूळ पिकल्या झाडाखाली, ढोल कुनाचा वाजजी
हां हां हां ढोल वाजजी, वाजजी ढोल वाजजी,
ढोल कुनाचा वाजजी ॥ धृ. ॥

हो येंधळ येड पाय कुनाच, झिम्मा फुगडी घालजी
हां हां हां झिम्मा घालजी, फुगडी फुगडी घालजी,
झिम्मा फुगडी घालजी ॥ १ ॥

समिंदराचं भरलं गाणं, उधान वारं आलजी
येड्या पिश्या भगतासाठी, पुरत लाजिर झालजी,
हां हां लाजिर झालजी, लाजिर लाजिर झालजी,
पुरत लाजिर झालजी ॥ २ ॥

मोडून गेल्या जुनाट वाटा, हा बोभाटा झालाजी
चोचींमंदी चोच टाकूनी, दाणं उष्ट झालजी,
झालजी
हां हां उष्ट झालजी, उष्ट उष्ट झालजी,
दाणं उष्ट झालजी ॥ ३ ॥

जांभळीच्या झाडाखाली, सोयर बोल बोलजी
जांभळीच पानं खोडं,
पिकुन पिवळ झालजी ॥ ४ ॥

शततारका